सबसे 'तेज' ग्लोबल महातेज...!

Postal Regd. No. JAL/443/2025-2027

# ग्लोबल महातेज

https://epaper.globalmahatej.com/

RNI. NO. MAHBIL /25/A0192

वर्ष १ ले | अंक : २७८ | मंगळवार, दि. ३० जून २०२६ | पाने : ४ | अमळनेर | किंमत : ३ रुपये | Email - globalmahatej@gmail.com

**रवि ज्वेलर्स**
सराफ बाजार, अमळनेर.
मो. ७०७४७४२१२१

**सोने-चांदी**
आजचे भाव

२४ Ct सोने ९९.५०% : ₹ १४३७००
२२ Ct सोने ९१.६०% : ₹ १३१०००
१८ Ct सोने ७५.००% : ₹ ११००००
शुद्ध चांदी ९९९% : ₹ २२८०/-
भाव प्रती १० ग्राम

बेवारस मृतदेह विल्हेवाट प्रकरण

# घनकचरा व्यवस्थापन कंत्राटदार, स्वच्छता निरीक्षकांना पालिका मुख्याधिकाऱ्यांकडून 'कारणे दाखवा'

## कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका; तत्काळ लेखी कार्य अहवाल सादर करण्याचे आदेश

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील गांधलीपुरा-कब्रस्तान परिसरात दि. २३ जून २०२६ रोजी बेवारस स्थितीत मृतदेह आढळून आला होता. त्यास ग्रामीण रुग्णालयात नेल्यानंतर तेथील वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्यास मृत घोषित केले होते. त्यानंतर सदर बेवारस व्यक्तीच्या मृतदेहाची रुग्णालयाच्या शववाहिनीऐवजी पालिकेच्या कचरा संकलनाच्या घंटागाडीतून स्मशानभूमीपर्यंत वाहतूक करण्यात आल्याचा अतिशय निंदनीय प्रकार नुकताच घडला. या प्रकाराची गंभीर दखल घेऊन पालिका मुख्याधिकारी गणेश शिंदे यांनी घनकचरा व्यवस्थापनाची मक्तेदार कंपनी मे. एस. आर. ग्रीनवे एम्पायर (नाशिक) तसेच पालिकेचे स्वच्छता निरीक्षक संतोष माणिक यांना कर्तव्यात कसूर केल्याचा ठपका ठेवत तत्काळ लेखी स्वरूपात कार्य अहवाल सादर करण्याचे आदेश नोटिशींद्वारे बजावले आहेत.

घनकचरा व्यवस्थापनाची मक्तेदार कंपनीस दि. २६ जून २०२६ रोजी दिलेल्या नोटिशीत म्हटले आहे, की पालिकेने आपणास घर ते घनकचरा संकलन करून वाहतूक करणे व त्यावर प्रक्रिया करणेकामी कार्यादेश दिलेला असताना आपल्याकडून सदर कामात सातत्याने निष्काळजीपणा, कमालीची दिरंगाई व कर्तव्यात गंभीर कसूर होत असल्याचे निदर्शनास आले आहे. विशेषतः २६ जून २०२६ रोजी बेवारस व्यक्तीच्या मृतदेहाच्या अंत्यविधीसंदर्भात आपणास २५ जून २०२६ रोजी आदेश देण्यात आला




होता. कंत्राटातील अटीनुसार व मानवी दृष्टिकोनातून बेवारस मृतदेहासाठी स्वतंत्र वाहनाची व्यवस्था करणे बंधनकारक असताना आपण पालिकेच्या व वरिष्ठ अधिकाऱ्यांची कोणतीही पूर्वसूचना न देता पालिकेच्या मालकीच्या घंटागाडीतून विल्हेवाटीसाठी मृतदेह स्मशानभूमीत नेला. ही कृती अत्यंत लाजिरवाणी व कंत्राटाचे उल्लंघन करणारी आहे. तसेच शहरातील कचरा संकलनही वेळेत होत नसल्याने शहराची स्वच्छता बाधित होत आहे. याबाबत आपणास वारंवार सूचना देऊनही आपणाकडून सुधारणात्मक कार्यवाही झालेली नाही. यासंदर्भात आपणास ही अंतिम नोटीस देण्यात येत असून, २६ जून २०२६ रोजीच्या घटनेचा स्पष्टीकरण अहवाल लेखी स्वरूपात सर्व अपेक्षित मुद्द्यांसह पालिकेस सादर करावा. सदर अहवाल असमाधानकारक वाटल्यास आपल्याविरुद्ध कंत्राटातील अटी-शर्तींचा भंग केल्यामुळे अनामत रक्कम जप्त करून थकीत असलेल्या देयकातून योग्य त्या दंडाची रक्कम वसूल केली जाईल. तसेच आपल्या संस्थेस काळ्या यादीत समाविष्ट करण्यासंदर्भात कायदेशीर प्रक्रिया सुरू करण्यात येईल, याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

पालिका स्वच्छता निरीक्षकास दि. २७ जून २०२६ रोजी दिलेल्या कारणे दाखवा नोटिशीत म्हटले आहे, की दि. २३ जून २०२६ रोजी गांधलीपुरा-कब्रस्तान परिसरात मृतावस्थेतील बेवारस व्यक्तीची सन्मानपूर्वक विल्हेवाट लावण्याकामी आवश्यक ती कायदेशीर मदत पुरविण्याची जबाबदारी आदेशाद्वारे आपल्यावर सोपविण्यात आली होती. परंतु दि. २६ जून २०२६ रोजी आपल्या विभागातील कंत्राटी तत्त्वावर कार्यरत कचरा संकलन करणाऱ्या घंटागाडीचा वापर करत सदर बेवारस मृतदेह ग्रामीण रुग्णालयातून थेट स्मशानभूमीत आणण्यात आला. सदर प्रकार अतिशय असंवेदनशील असून या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडिया तसेच विविध वृत्तवाहिन्यांवरून मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. यामुळे पालिकेचा कारभार व संवेदनशीलतेसह प्रशासकीय व्यवस्थेबाबत सर्वत्र तीव्र संताप व नाराजी केली जात आहे. त्यामुळे सदर कारणे दाखवा नोटीस मिळाल्यापासून २४ तासांत आपला लेखी खुलासा सादर करावा. खुलासा मुदतीत प्राप्त न झाल्यास किंवा खुलासा असमाधानकारक असल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता आपणाविरुद्ध एकतर्फी शिस्तभंगाची कारवाई प्रस्तावित करण्यात येईल, याची गंभीरतेने नोंद घ्यावी. दरम्यान, सदर कारणे दाखवा नोटिशीची प्रत नगराध्यक्षांकडेही पाठविली आहे.

दरम्यान, पालिका मुख्याधिकाऱ्यांनी घनकचरा व्यवस्थापन मक्तेदार व पालिका स्वच्छता निरीक्षक यांना बजावलेल्या या नोटिशींचा कार्य अहवाल संबंधितांकडून कधी सादर करण्यात येतो आणि त्यावर यापुढील काय कारवाई होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

आजचे
अभीष्टचिंतन



श्री. विशाल वाघ
शिक्षक



श्री. मनीष पाटील
अमळनेर



श्री. चिंपू महाजन
अमळनेर



श्री. मेहूल कुलकर्णी
पुरोहित : श्री मंगळग्रह मंदिर

## सात फेरे पतीच्या दीर्घायुष्यासाठी..!



अमळनेर : ज्येष्ठ मासातील वटपौर्णिमेनिमित्त सोमवार, दि. २९ जून रोजी श्री मंगळग्रह मंदिर परिसरात विवाहित महिलांनी वडाच्या वृक्षाची पूजा करून त्याला पवित्र धागे गुंडाळत, सात फेरे मारत पतीच्या दीर्घायुष्य, उत्तम आरोग्य आणि अखंड सौभाग्यासाठी प्रार्थना केली. पारंपरिक वेशभूषेत पूजा साहित्य आणि भक्तिभावाने साजरा झालेला वटपौर्णिमेचा सण भारतीय संस्कृतीतील कुटुंबनिष्ठा, श्रद्धा आणि निसर्गपूजेचे प्रतीक मानला जातो. वडाचा वृक्ष दीर्घायुष्य, स्थैर्य आणि समृद्धीचे प्रतीक असल्याने या सणाला विशेष धार्मिक व सांस्कृतिक महत्त्व आहे. (छायाचित्र : मयूर चौधरी)

## गेल्या ५८ वर्षांची सेवा परंपरा यापुढेही कायम ठेवू

### लायन्स क्लबच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळ्याप्रसंगी निर्धार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : समाजसेवा, आरोग्य, शिक्षण, पर्यावरण आणि विविध लोकहिताच्या उपक्रमांद्वारे गेली ५८ वर्षे शहरात वेगळी ओळख निर्माण करणाऱ्या लायन्स क्लबचा सन २०२६-२७ या वर्षासाठीच्या नूतन कार्यकारिणीचा ५८ वा पदग्रहण सोहळा शनिवार, दि. २७ जून रोजी सायंकाळी येथील बन्सीलाल पॅलेसमध्ये उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. ज्येष्ठ लायन नेते तथा पास्ट मल्टिपल कौन्सील चेअरपर्सन (पुणे) एमजेएफ लायन द्वारकाप्रसाद जालन यांच्या हस्ते नूतन पदाधिकाऱ्यांचा सन्मान करून पदाची शपथ देवविली.

यावेळी जितेंद्र पारख यांनी अध्यक्ष, प्रा. जयेश गुजराथी यांनी सचिव, तर कुमारपाल कोठारी यांनी खजिनदार म्हणून पदभार स्वीकारला. नव्या कार्यकारिणीने सेवा, संस्कार आणि सामाजिक बांधिलकी जपत समाजातील गरजू, वंचित व दुर्बल घटकांसाठी अधिक प्रभावी उपक्रम राबविण्याचा निर्धार व्यक्त केला.

(पान २ वर)




अमळनेर : लायन्स क्लबच्या नूतन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा शनिवार, दि. २७ जून रोजी सायंकाळी येथील बन्सीलाल पॅलेसमध्ये झाला. याप्रसंगी नूतन अध्यक्ष जितेंद्र पारख यांचा सन्मान करताना ज्येष्ठ लायन नेते तथा पास्ट मल्टिपल कौन्सील चेअरपर्सन (पुणे) एमजेएफ लायन द्वारकाप्रसाद जालन. शेजारी सचिव प्रा. जयेश गुजराथी, तर खजिनदार कुमारपाल कोठारी, मावळते अध्यक्ष डॉ. संदीप जोशी, प्रदीप जैन, प्रा. जयेश गुजराथी आदी.

**दिनविशेष**
३० जून
- आंतरराष्ट्रीय लघुग्रह दिवस
- सोशल मीडिया दिवस

गर्व से कहो स्वदेशी है हम...!
स्वदेशी ही खरिदेंगे हम...!!

स्वातंत्र्यपूर्व संग्रामातील स्वदेशीची हाक आता पुन्हा देवू या. नवरात्रोत्सवात आपण आदिमाया आदिशक्तीचा जागर करतो त्याप्रमाणेच स्वदेशीचाही जागर करूया..! सच्च्या भारतीयांवर जेव्हा-जेव्हा परकीय आक्रमण होते तेव्हा-तेव्हा ते प्रचंड त्वेषाने पेटून उठतात...!! आता तीच वेळ येऊन ठेपली आहे...!!! जय भारत...! जय स्वदेशी...!!

## जवखेड्यात ठिबक नळ्यांवरून दोन गटांत हाणामारी; गुन्हा दाखल

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील जवखेडा येथे शेतातील ठिबक सिंचनाच्या नळ्या टाकण्याच्या कारणावरून दोन गटांमध्ये वाद होऊन त्याचे पर्यवसान हाणामारीत झाले. या प्रकरणी दोन्ही गटांनी एकमेकांविरुद्ध अमळनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली असून, परस्परांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले आहेत.

याबाबत पहिल्या फिर्यादीनुसार जवखेडा येथे ५५ वर्षीय महिला व त्यांचे पती शेतात ठिबकच्या नळ्या टाकत असताना शेजारील शेतमालक संदीप आधार पाटील, देवचंद आधार पाटील, रजूबाई आधार पाटील आणि मोनाली संदीप पाटील तेथे आले. त्यांनी शिवीगाळ करून ठिबकच्या नळ्या फेकून दिल्या. याबाबत जाब विचारल्यानंतर संदीप आधार पाटील यांनी लोखंडी सळईने महिलेच्या डोक्यावर व पाठीवर मारहाण केल्याचा तसेच तिची साडी फाडल्याचा आरोप फिर्यादीत करण्यात आला आहे. या गोंधळात फिर्यादी महिलेची सोन्याची पोत गहाळ झाली असून, इतर आरोपींनी तिच्या पतीलाही मारहाण केल्याचे नमूद करण्यात आले आहे. या प्रकरणी अमळनेर पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस उपनिरीक्षक कविता ठाणगे तपास करीत आहेत.

दुसऱ्या फिर्यादीनुसार रजुबाई आधार पाटील या त्यांचे पती व सून यांच्यासह शेतातून घरी जात असताना शेजारील शेतकरी सुभाष नत्थु पाटील, प्रतिभा सुभाष पाटील, गुलाब मधुकर पाटील, वंदना गुलाब पाटील आणि मोहित गुलाब पाटील हे रस्त्यावर ठिबकच्या नळ्या टाकत होते. त्याबाबत जाब विचारल्याचा राग आल्याने त्यांनी रजूबाई यांच्या पतीला काठी व पावडीने मारहाण केल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच भांडण सोडविण्यास गेलेल्या रजूबाई पाटील व त्यांच्या सुनेलाही ढकलून दिल्याचे त्यात म्हटले आहे. या गोंधळात त्यांच्या सुनेची सोन्याची पोत गहाळ झाल्याची तक्रारही करण्यात आली आहे. या प्रकरणीही अमळनेर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हवालदार कैलास शिंदे तपास करीत आहेत.

# आमदार अनिलदादा पाटील यांच्या प्रयत्नातून कोळपिंप्रीत अत्याधुनिक डिजिटल अंगणवाडी

## जिल्हा परिषद अधिकाऱ्यांकडून पाहणी; कामाचे तोंडभरून कौतुक

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : कोळपिंप्री (ता. पारोळा) येथे माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा भाईदास पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे उभारण्यात आलेली अत्याधुनिक आणि डिजिटल सुविधांनी सुसज्ज अंगणवाडी आज जिल्ह्यासाठी आदर्श ठरत आहे. बालकांच्या सर्वांगीण विकासाचा विचार करून उभारण्यात आलेल्या या अंगणवाडीची पाहणी करण्यासाठी जिल्हा परिषद व पंचायत राज विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांनी विशेष भेट देत प्रत्यक्ष कामाची पाहणी केली.

या भेटीदरम्यान उपस्थित सर्व अधिकारी व मान्यवरांनी अंगणवाडीच्या दर्जेदार बांधकामासह आधुनिक सुविधांचे कौतुक केले. हा उपक्रम जिल्ह्यातील इतर गावांसाठी प्रेरणादायी असल्याचे मत व्यक्त केले.




अमळनेर : कोळपिंप्री (ता. पारोळा) येथे माजी मंत्री तथा आमदार अनिलदादा भाईदास पाटील यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे उभारण्यात आलेल्या अत्याधुनिक आणि डिजिटल सुविधांनी सुसज्ज अंगणवाडीला भेट देऊन पाहणी करताना जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, कनिष्ठ अभियंता संदीप सोनावणे, शाखा अभियंता वैशालीताई जडे, गटविकास अधिकारी कदम, विस्तार अधिकारी चिंचोरे व सरपंच.

### पाहणी दौऱ्यात उपस्थित मान्यवर

पाहणी दौऱ्यात जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी रणधीर सोमवंशी, कनिष्ठ अभियंता संदीप सोनावणे, शाखा अभियंता वैशालीताई जडे, गटविकास अधिकारी कदम, मुख्याध्यापक चौधरी, प्राथमिक शिक्षक सुनील पाटील, राष्ट्रवादी काँग्रेसचे कार्याध्यक्ष सुनील काटे, विस्तार अधिकारी चिंचोरे, उपसभापती चंद्रकांत पाटील तसेच कोळपिंप्रीचे सरपंच आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### सुविधांची पाहणी

अधिकाऱ्यांनी अंगणवाडीतील प्रशस्त वर्गखोली, आकर्षक शैक्षणिक भित्तिचित्रे, डिजिटल शिक्षणासाठी आवश्यक साहित्य, बालमैत्रीपूर्ण वातावरण, सुरक्षित परिसर, स्वच्छ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, स्वतंत्र स्वच्छतागृह, खेळणी, अध्ययन साहित्य तसेच पोषण व आरोग्यविषयक सुविधा यांची सविस्तर पाहणी करून समाधान व्यक्त केले.

(पान २ वर)

## संपादकीय

# पोस्टाच्या स्पीडवर नव्याने शिक्कामोर्तब

भारतातील पोस्ट व्यवस्था अत्यंत उत्तम स्वरूपाची आणि सामान्य माणसाला खूप मोठा दिलासा देणारी व्यवस्था म्हणता येते. अलीकडेच अनेक टीव्ही चॅनेल्सवर पोस्ट ऑफिसच्या स्पीड पोस्ट योजनेची रंगीत जाहिरात दाखविली गेली. पहिल्यांदाच पोस्ट ऑफिसची अशाप्रकारे जाहिरात केली गेलेली आहे. विशेष म्हणजे एका दिवसांमध्ये स्पीड पोस्ट डिलिव्हरी आपल्या घरापर्यंत पोहोचविण्याची हमी या जाहिरातीतून दाखविली गेली. पोस्ट ऑफिसच्या स्पीड पोस्ट योजनेने घेतलेली ही मोठी झेप म्हणता येईल. आजच्या तंत्रज्ञानाच्या युगामध्ये नेट, इंटरनेट, ई-मेल या सगळ्या गोष्टी इतक्या वेगाने पसरल्या आहेत की काय काही क्षणांमध्ये तुम्हाला तुमचे मेसेजेस पाठविता येतात. ई-मेलवरून पत्रव्यवहारही करता येऊ शकतो. परंतु ज्यांना काही महत्त्वाच्या कागदपत्रांची पूर्तता करायची असते किंवा काही वस्तू देखील पोस्टाच्या माध्यमातून थेट घरपोच पोहोचवायच्या असतात, अशा वेळेला खात्रीशीर व्यवस्था आवश्यक असते. आजच्या धकाधकीच्या आणि धावपळीच्या जीवनामध्ये लोकांना विश्वासार्ह व्यवस्थेची खूप गरज भासते. गेल्या काही वर्षांत पोस्ट व्यवस्था ढेपाळली होती आणि त्यातूनच खासगी कुरिअरची व्यवस्था प्रचंड बोकाळलीसुद्धा आहे. ज्याला आपण सेवा उद्योगांमध्ये समाविष्ट केले, अशा या कुरिअर सर्व्हिसने देशभरच नव्हे तर आंतरराष्ट्रीय स्तरावर सुद्धा मोठा उद्योग उभा केलेला आहे. कुरिअर सर्विसमधून अनेकांना रोजगार मिळाला आणि सामान्य माणसालाही अनेक प्रकारची कागदपत्र आणि वस्तू थेट घरपोच पोहोचविता आल्या. त्यासाठी पोस्टाच्या व्यवस्थेवर अवलंबून राहण्याची गरज भासली नव्हती. कारण पोस्टाचा सगळा सरकारी कारभार असल्याने पत्र वेळेवर न पोहोचण्यापासून ते अगदी रजिस्टर केलेली सामुग्रीसुद्धा ठरल्या वेळेत पोहोचेलच याची कोणतीच हमी लोकांना मिळत नव्हती.

पोस्ट व्यवस्थेने आपल्या कारभारातला ढिसाळपणा दाखवून दिल्याने लोकांचा पोस्ट व्यवस्थेचा विश्वासही उडाला होता. परंतु गेल्या पाच-दहा वर्षांमध्ये देशातील पोस्ट व्यवस्था अधिक मजबूत आणि तंत्रज्ञानयुक्त करण्याचा प्रयत्न झाला. आज देशभरातील जवळपास एक लाख ५५ हजार पोस्ट ऑफिसमध्ये आधुनिकीकरण केले गेले आहे. तंत्रज्ञानाचा सर्व प्रकारे वापर केला जातो आहे. मग अगदी ऑनलाईन मनी ट्रान्सफरपासून ते स्पीड पोस्टपर्यंत अशा उत्तम दर्जाची व्यवस्था दिली जाते आहे. बचतीच्या अनेक योजना खूप प्रभावीपणे राबविल्या जात आहेत आणि पोस्ट ऑफिस हे आता बचत बँक म्हणूनही लोकप्रिय झालेले पाहायला मिळते. आजच्या या धावपळीच्या आणि वेगवान युगामध्ये पोस्टालाही आपल्या कारभारांमध्ये गतिमान होणे अत्यंत आवश्यक होते. देशभरामध्ये अनेक वर्षांपासून इतके मोठे जाळे असणारी भारतातील ही सर्वांत प्रभावी पोस्ट यंत्रणा आणि व्यवस्था म्हणता येईल. ज्या ठिकाणी पोस्ट कार्यालय आहेत आणि तशा पद्धतीचा कर्मचारी वर्ग सुद्धा कार्यरत आहे. फक्त या सगळ्या व्यवस्थांना गती आणि त्यांच्यातील कार्यक्षमता वाढविण्याची आवश्यकता होती. गेल्या आठ-दहा वर्षांमध्ये पोस्ट ऑफिसचे हे महत्त्व सरकारच्याही लक्षात आले आणि सरकारने त्यात अधिक निधी गुंतवून पोस्ट व्यवस्थेचे आधुनिकीकरण करण्याचा प्रयत्न केला. त्याचेच परिणाम म्हणून आता पोस्टाला या वेगवान युगामध्ये स्वतःचे अस्तित्व सिद्ध करण्याची आणि कार्यक्षमता सिद्ध करण्याची संधी प्राप्त झालेली आहे. आज जागतिक पातळीवर अनेक कॉर्पोरेट कंपन्यासुद्धा कुरिअर व्यवस्थेचा उद्योग करतात आणि देश पातळीवरसुद्धा अनेक खासगी कुरिअर संस्थांनी आपले बस्तान बसविलेले असताना जर पोस्ट ऑफिस एका दिवसामध्ये स्पीड पोस्टच्या माध्यमातून वस्तू किंवा कागदपत्र पोहोचविण्याची हमी देत असेल तर ही भारतातील सर्वसामान्य माणसासाठी खूप मोलाची गोष्ट ठरते.

कुरिअरला द्यावे लागणारे पैसे आणि त्या तुलनेत पोस्ट ऑफिसच्या स्पीड पोस्ट सेवेला द्यावे लागणारे पैसे यामध्ये थोडाफार फरक पडू शकतो. परंतु पोस्टच्या माध्यमातून आपल्या वस्तू अधिक खात्रीशीर आणि विश्वासपूर्ण रीतीने पोहोचतील याची हमी सरकारच घेत असल्यामुळे या व्यवस्थेवर लोकांचा अधिक भरोसा राहील यात काही शंका नाही. या योजनेच्या प्रसारासाठी जर केंद्र सरकारकडून इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा किंवा प्रसारमाध्यमांचा योग्य पद्धतीने वापर होत असेल तर त्याचे देखील स्वागत केले पाहिजे. आज देशभरामध्ये या स्पीड पोस्टचा अधिकाधिक प्रसार प्रचार करून लोकांना खात्रीशीर कुरिअर व्यवस्था पोस्टाने उपलब्ध करून देण्याचे हे आव्हान स्वीकारले पाहिजे. कर्मचाऱ्यांना आवश्यक ते प्रशिक्षण आणि आवश्यक त्या सोयी-सुविधा दिल्या जातात. जेणेकरून अधिकाधिक वेगाने लोकांच्या वस्तू किंवा कागदपत्र पोहोचविण्याची यंत्रणा कार्यरत राहते. आता या सगळ्या बदलत्या काळामध्ये एका दिवसातच नव्हे; तर काही मिनिटांमध्ये घरपोच वस्तू पोहोचविणाऱ्या खासगी कंपन्या आपल्याला पाहायला मिळतात. मध्यंतरीच्या काळामध्ये ब्लिंकीट नावाच्या कॉर्पोरेट कंपनीने ही व्यवस्था अस्तित्वात आणली आणि केवळ दहा ते पंधरा मिनिटांमध्ये तुमच्या घरी तुम्ही नोंदविलेली किंवा मागवलेली गोष्ट पोहोचती करण्याचा प्रकार सुरू केला आणि ती व्यवस्था प्रचंड लोकप्रिय झालेली आहे. अशा पद्धतीने पोस्टाला सुद्धा आपल्या कारभारामध्ये खूप मोठा वेग आणता येऊ शकतो आणि पोस्टावरच्या कार्यक्षमतेवर एक नवे शिक्कामोर्तब या निमित्ताने घडवून आणता येऊ शकते. पोस्टाचा वेग म्हणजेच स्पीड वाढू शकतो किंवा खासगी कंपन्यांच्या स्पर्धेत खूप मोठा ठसा उमटवू शकते. आतापर्यंत सरकारनेच दुर्लक्ष केल्याने पोस्ट कारभारामध्ये गतिमानता येऊ शकली नव्हती. जागतिक स्तरावरसुद्धा भारतातील पोस्ट यंत्रणा सर्वांत मोठी ठरते. खेड्यापाड्यापर्यंत तिचे जाळे पोहोचलेले आहे. अनेक वर्षांच्या या रेडिमेड व्यवस्थेचा पूर्ण उपयोग करून घेणे अत्यंत गरजेचे होते.

# सभापती बदलाचे संकेत; ४ जुलैच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष

## आमदार अनिलदादा सांगतील तेव्हा राजीनामा : अशोक पाटील

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर कृषी उत्पन्न बाजार समिती



अमळनेर : येथील कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती अशोक आधार पाटील यांनी पद भूषवून आता तीन वर्षे पूर्ण होत आली आहेत. त्यामुळे आता सभापती बदलाच्या हालचालींना वेग आला आहे. आगामी जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर नव्या चेहऱ्यांना संधी देण्याच्या दृष्टीने आमदार अनिलदादा पाटील यांच्याकडून हालचाली सुरू झाल्या असल्याची राजकीय वर्तुळात चर्चा आहे. यामुळे शनिवार, दि. ४ जुलै २०२६ रोजी होणाऱ्या बाजार समितीच्या बैठकीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

याबाबतची अधिक माहिती अशी, की दि. १६ मे २०२३ रोजी अशोक आधार पाटील यांची कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतिपदी निवड झाली होती. सुरूवातीला त्यांचा कार्यकाळ एक वर्षाचा अपेक्षित होता. मात्र, राज्यातील राजकीय घडामोडींमुळे त्यांना सलग तीन वर्षे सभापतिपद भूषविण्याची संधी मिळाली. दरम्यान, शेतकी संघात लोण येथील संभाजी लोटन पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश देऊन अध्यक्षपदाची जबाबदारी देण्यात आल्याने एकाच भागाकडे दोन महत्त्वाची पदे राहू नयेत आणि इतरांनाही संधी मिळावी, अशी मागणी आता पुढे येत आहे.

सूत्रांकडील माहितीनुसार आगामी निवडणुकांचा विचार करून आमदार पाटील कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापतिपदी नव्या नेतृत्वाला संधी देण्याच्या भूमिकेत असून, दि. ४ जुलै रोजीच्या बैठकीत सभापती अशोक पाटील यांचा राजीनामा घेतला जाण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. दरम्यान, तीन वर्षांच्या कार्यकाळात अशोक पाटील यांनी बाजार समितीत अनेक विकासकामे केल्याचा दावा केला जात आहे. चार कोटी रुपयांचे कर्ज असलेली बाजार समिती कर्जमुक्त करून सध्या चार कोटी रुपयांच्या नफ्यात आणल्याचे सांगितले जाते. तसेच शंभर गाळे बीओटी तत्त्वावर देण्याचा निर्णय, २५ नवीन गाळ्यांच्या उभारणीतून सुमारे अडीच कोटी रुपयांचे उत्पन्न, बाजार समिती व खेडा खरेदी केंद्रांवर सीसीटीव्ही यंत्रणा, मारवड उपबाजारासाठी कंपाऊंड व उपबाजार सुरू करण्याचा प्रस्ताव, शेतकरी सन्मान उपक्रम, हजारो शेतकऱ्यांसाठी मोफत बैलपोळा, हमाल-मापाडी विमा योजना, मापाड्यांसाठी लॉकर, गुमास्ता कट्टा, सौर ऊर्जा प्रकल्प, शेतकरी सुविधा केंद्र, शासकीय लेखापरीक्षण कार्यालय, शेतकऱ्यांसाठी एटीएम सुविधा, स्वखर्चातून आरओ पाणी व्यवस्था तसेच एक कोटी रुपयांचे काँक्रिटीकरण अशी विविध कामे करण्यात आल्याने बाजार समितीने जिल्ह्यात अग्रक्रम मिळविल्याचा दावा करण्यात येत आहे.

याशिवाय राज्याचे दिवंगत उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचा शेतकरी वेशातील पहिला पुतळा अमळनेर बाजार समितीत उभारण्यात आला आहे. पणनमंत्री जयकुमार रावल, खासदार श्रीमती स्मिताताई वाघ आणि आमदार पाटील यांच्या सहकार्याने शेतकरी भवन तसेच शेतकऱ्यांना अवघ्या पाच रुपयांत भोजन उपलब्ध करून देणारी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज भोजन योजना सुरू करण्यालाही मंजुरी मिळाल्याचे सांगण्यात आले आहे.

### ...तर दीड महिन्यात मी पद सोडण्यास तयार

सभापती बदलाच्या चर्चेबाबत अशोक आधार पाटील यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, की आमदार अनिलदादा पाटील यांच्यामुळेच मला एक नव्हे तर तीन वर्षे सभापतिपदाची संधी मिळाली. त्यांनी माझ्यावर विश्वास दाखविला आणि मीही पदाला न्याय देण्याचा प्रयत्न केला. ते सांगतील त्या दिवशी मी राजीनामा देण्यास तयार आहे. मात्र, माझ्या कार्यकाळात मंजूर झालेले शेतकरी भवन आणि भोजन योजनेचा शुभारंभ झाल्यानंतर दीड महिन्याच्या आत मी पद सोडण्यास तयार आहे.

### पक्षीय बलाबल असे

सध्या कृषी उत्पन्न बाजार समितीत राष्ट्रवादी काँग्रेसचे ८, भारतीय जनता पक्षाचे ५, काँग्रेसचे २ आणि व्यापारी गटाचे २ असे एकूण १७ सदस्य आहेत. मागील वेळी कार्यकाळाच्या मुद्यावरून सचिन पाटील यांची सभापतिपदाची संधी हुकली होती. त्यामुळे यावेळी बाजार समितीच्या सभापतिपदी कोणाची वर्णी लागते, याकडे राजकीय वर्तुळासह शेतकरी आणि व्यापाऱ्यांचे लक्ष लागले आहे.

# कोळपिंप्रीत अत्याधुनिक डिजिटल अंगणवाडी

**पान १ वरून**

अधिकारी वर्गाने सांगितले, की अंगणवाडी ही केवळ बालसंगोपनाची जागा नसून बालकांच्या शारीरिक, बौद्धिक, मानसिक आणि सामाजिक विकासाचा मजबूत पाया घालणारे केंद्र आहे. अशा दर्जेदार व आधुनिक अंगणवाड्या उभारल्यास ग्रामीण भागातील बालशिक्षणाची गुणवत्ता निश्चितच उंचावेल.

### आमदारांच्या कार्याचे कौतुक

यावेळी उपस्थित अधिकाऱ्यांनी आमदार अनिलदादा पाटील यांच्या विकासाभिमुख दृष्टिकोनाचे विशेष कौतुक केले. त्यांनी सातत्याने शासनाकडे पाठपुरावा करून कोळपिंप्रीसारख्या ग्रामीण भागात अत्याधुनिक अंगणवाडी मंजूर करून गावकऱ्यांना एक उत्कृष्ट सुविधा उपलब्ध करून दिली आहे. जिल्ह्यात अशा प्रकारची डिजिटल अंगणवाडी उभारणे ही उल्लेखनीय बाब असून, हा प्रकल्प इतर ग्रामपंचायतींसाठीही आदर्श ठरेल.

### अंगणवाडी योजनेचे महत्त्व

महिला व बालविकास विभागाच्या एकात्मिक बाल विकास सेवा योजनेंतर्गत अंगणवाड्यांमधून ० ते ६ वर्षे वयोगटातील बालकांना पूरक पोषण आहार, पूर्वप्राथमिक शिक्षण, नियमित आरोग्य तपासणी, लसीकरण, वाढ नोंदणी तसेच गर्भवती व स्तनदांना पोषण आणि आरोग्यविषयक मार्गदर्शन दिले जाते. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० नुसार बालपणीच्या शिक्षणाला विशेष महत्त्व देण्यात आले आहे.

कोळपिंप्री येथील ही डिजिटल अंगणवाडी बालकांसाठी आनंददायी शिक्षण, आधुनिक सुविधा आणि सुरक्षित वातावरण उपलब्ध करून देणारी ठरत असून ग्रामीण भागातील विकासाचा नवा आदर्श म्हणून तिच्याकडे पाहिले जात आहे.

# ५८ वर्षांची सेवा परंपरा यापुढेही कायम ठेवू

**पान १ वरून**

कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्येची देवता सरस्वती यांच्या प्रतिमेचे पूजन करून सोहळ्याची सुरूवात झाली. त्यानंतर उपस्थित मान्यवरांचे स्वागत करण्यात आले. शपथविधीनंतर मार्गदर्शन करताना प्रमुख पाहुणे एमजेएफ लायन जालन म्हणाले, की लायन्स क्लब ही केवळ संस्था नसून समाजसेवेची अखंड चळवळ आहे. अमळनेर लायन्स क्लबने गेल्या ५८ वर्षांत सेवाभावी कार्याची समृद्ध परंपरा निर्माण केली असून, नव्या नेतृत्वाखाली ही परंपरा अधिक व्यापक स्वरूपात पुढे जाईल.

मावळते अध्यक्ष डॉ. संदीप जोशी यांनी वर्षभरातील सामाजिक, आरोग्य, शैक्षणिक व जनहिताच्या उपक्रमांचा आढावा सादर केला. तसेच नितीन विंचूरकर यांनी विविध सेवा प्रकल्पांचा सविस्तर अहवाल मांडला. झोन चेअरपर्सन लायन जितेंद्र जैन यांनीही मार्गदर्शन करताना लायन्स क्लबच्या सातत्यपूर्ण सेवाभावी कार्याचे कौतुक केले. नव्या कार्यकारिणीने समाजहिताला प्राधान्य देत अधिकाधिक लोकांपर्यंत सेवा पोहोचवावी, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. कार्यक्रमात प्रदीप जैन व डॉ. मिलिंद नवसारीकर यांनी मान्यवरांचा परिचय करून दिला. मावळत्या पदाधिकाऱ्यांनी नूतन पदाधिकाऱ्यांना बॅच परिधान करून पदभार सुपूर्द केला. आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा देत 'आम्ही कायम आपल्या पाठीशी आहोत,' अशी भावना त्यांनी व्यक्त केली.

मनोगतातपारखम्हणाले,कीसेवा,संस्कारआणिसामाजिकबांधिलकीजपत लायन्सक्लबचेउपक्रमअधिकव्यापकस्वरूपातराबविण्यासप्राधान्यदिलेजाईल. या सोहळ्यास लायन्स क्लबचे सदस्य, लायन परिवार, रोटरी क्लबचे सदस्य तसेच शहरातील विविध क्षेत्रांतील प्रतिष्ठित नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी नूतन कार्यकारिणीचे अभिनंदन करत आगामी कार्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या. प्रा. नयना नवसारीकर, रूपाली सिंघवी आणि जया जैन यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. जयेश गुजराथी यांनी आभार मानले.

# पैलाड भागात तरुणाची आत्महत्या

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : येथील पैलाड भागातील विजय श्रावण पाटील (वय ४४) यांनी बुधवार, दि. २४ जून रोजी आपल्या राहत्या घरातील लाकडी कडीला दोरी बांधून गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना सायंकाळी साडेपाचच्या सुमारास उघडकीस आली. या घटनेचे वृत्त परिसरात कळताच एकच खळबळ उडाली. याबाबत अमळनेर पोलीस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, आत्महत्येमागील नेमके कारण अद्याप समोर आलेले नसून हवालदार गणेश पाटील तपास करीत आहेत.

# डांगरच्या मोबाईल टॉवरवर चोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

अमळनेर : तालुक्यातील डांगर शिवारातील मोबाईल टॉवरवरून चोरट्यांनी बॅटरी, पॉवर केबल व ऑप्टिकल केबल असा सुमारे ४१ हजार रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना उघडकीस आली आहे. अशोक कापडणे यांच्या शेतातील मोबाईल टॉवरवर ही चोरी झाली असून, याबाबत अमोल शिंदे यांनी अमळनेर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार गुन्हा दाखल झाला आहे. या प्रकाराचा हवालदार काशिनाथ पाटील तपास करीत आहेत.

# मुंढे यांचा जीवनप्रवास येणार पुस्तकरूपात!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



आपल्या धडाडीच्या, पारदर्शक आणि जनहितवादी प्रशासनशैलीमुळे राज्यभर परिचित असलेले २००५ बॅचचे आयएएस अधिकारी तुकाराम मुंढे यांच्या जीवनप्रवासावर आधारित पुस्तक लवकरच वाचकांच्या भेटीला येत आहे. एका कणखर प्रशासकाच्या खडतर आयुष्याचा आणि संघर्षमय वाटचालीचा वेध घेणारे हे पुस्तक सध्या चर्चेचा विषय ठरत आहे. न्यू ईरा पब्लिकेशनतर्फे या पुस्तकाचे प्रकाशन होणार असून ज्येष्ठ पत्रकार शफी पठाण यांनी हे पुस्तक लिहिले आहे. येत्या १७ जुलै रोजी या पुस्तकाचे प्रकाशन पुणे येथे होणार आहे.

सध्या अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त म्हणून कार्यरत असलेले तुकाराम मुंढे यांनी आपल्या कारकिर्दीत अनेक महत्त्वाची प्रशासकीय पदे भूषवली आहेत. नागपूर महानगरपालिका आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका आयुक्त यासह विविध जबाबदारीच्या पदांवर काम करताना घेतलेल्या निर्णयांमुळे ते नेहमीच चर्चेत राहिले.

ग्रामीण पार्श्वभूमीतून पुढे येत भारतीय प्रशासकीय सेवेत स्थान मिळविण्यापासून ते विविध पदांवर कार्य करताना आलेल्या आव्हानांचा सामना करण्यापर्यंतचा त्यांचा प्रवास प्रेरणादायी मानला जातो. त्यांच्या आयुष्यातील संघर्ष, यश, प्रशासकीय अनुभव यांचा उलगडा या पुस्तकातून होणार आहे.

# जळगाव-मुंबई विमानसेवेत उद्यापासून मोठा बदल

## पूर्ण क्षमतेने सुरू होणार बुकिंग; शेकडो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**




अमळनेर : गेल्या काही महिन्यांपासून वाढत्या तापमानामुळे मर्यादित आसनक्षमतेने सुरू असलेल्या जळगाव-मुंबई विमानसेवेत अखेर मोठा बदल होणार आहे. बुधवार, दि. १ जुलै २०२६ पासून अलायन्स एअरचे विमान पुन्हा पूर्ण क्षमतेने धावणार आहे. उन्हाळ्यातील तीव्र उष्णतेमुळे तांत्रिक कारणास्तव विमानातील केवळ ५० आसनांचेच आरक्षण स्वीकारले जात होते. मात्र, तापमानात घट झाल्यानंतर ही मर्यादा हटविण्यात आली असून, आता प्रवाशांसाठी विमानातील सर्व आसने उपलब्ध करून देण्यात येणार असल्याची माहिती कंपनीच्या सूत्रांनी दिली आहे. यामुळे मुंबईकडे विमानाने प्रवास करणाऱ्या शेकडो प्रवाशांना मोठा दिलासा मिळणार आहे.

जळगाव विमानतळावरून उन्हाळ्याच्या दिवसांत विमानसेवा सुरू असताना प्रवाशांचा चांगला प्रतिसाद मिळत होता. मात्र, त्याच काळात जळगावसह संपूर्ण उत्तर महाराष्ट्रात उष्णतेची तीव्र लाट कायम होती. अनेक दिवस तापमानाचा पारा ४० ते ४५ अंश सेल्सिअसच्या दरम्यान नोंदविला जात होता. वाढत्या तापमानाचा थेट परिणाम विमानाच्या उड्डाण क्षमतेवर होत असल्याने विमान कंपनीला सुरक्षिततेच्या दृष्टीने काही तांत्रिक निर्णय घ्यावे लागले. उष्ण हवामानात हवेची घनता कमी होत असल्याने विमानाला आवश्यक लिफ्ट निर्माण करण्यासाठी अधिक धावपट्टीची आवश्यकता भासते. अशा परिस्थितीत विमानाचे एकूण वजन कमी ठेवणे गरजेचे असते. याच कारणामुळे ७२ आसनक्षमतेच्या विमानात केवळ ५० प्रवाशांचेच आरक्षण स्वीकारण्याचा निर्णय घेण्यात आला होता.

### मर्यादित आसनांमुळे प्रवाशांची गैरसोय

या निर्णयाचा परिणाम प्रवाशांवर मोठ्या प्रमाणात झाला. मर्यादित आसनसंख्येमुळे अनेकांना इच्छित तारखेला तिकीट मिळत नव्हते. विशेषतः व्यावसायिक, उद्योग क्षेत्रातील प्रतिनिधी, शासकीय अधिकारी, विद्यार्थी, मुंबईत उपचारासाठी जाणारे रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक यांना वेळेवर आरक्षण मिळविण्यासाठी मोठी धावपळ करावी लागत होती. अनेक वेळा विमानाचे तिकीट न मिळाल्याने प्रवाशांना रेल्वे किंवा रस्ते मार्गाचा पर्याय स्वीकारावा लागत होता. तसेच आसनांची उपलब्धता कमी आणि मागणी जास्त असल्याने विमान तिकिटांचे दरही तुलनेने अधिक होते. त्यामुळे प्रवाशांवर आर्थिक भारही वाढला होता.

### तापमान घटल्याने पूर्ण क्षमतेने सेवा

दरम्यान, जूनच्या उत्तरार्धात पावसाळा सक्रिय झाल्यानंतर जळगाव जिल्ह्यातील तापमानात लक्षणीय घट झाली आहे. दिवसाचे कमाल तापमान कमी झाल्याने विमानाच्या सुरक्षित उड्डाणासाठी आवश्यक असलेली तांत्रिक परिस्थिती पुन्हा अनुकूल बनली आहे. त्यामुळे विमानाचे वजन मर्यादित ठेवण्याची गरज उरलेली नसून, १ जुलैपासून सर्व ७२ आसनांचे आरक्षण उपलब्ध करून देण्याचा निर्णय कंपनीने घेतला आहे. यामुळे दररोज अधिक प्रवाशांना विमानप्रवासाची सुविधा मिळणार असून, आरक्षणासाठी होणारी गर्दी आणि प्रतीक्षा यादीचे प्रमाणही कमी होण्याची अपेक्षा आहे.

### उत्तर महाराष्ट्रातील प्रवाशांना लाभ

जळगाव-मुंबई विमानसेवा ही उत्तर महाराष्ट्रातील नागरिकांसाठी अत्यंत महत्त्वाची वाहतूक सेवा ठरली आहे. मुंबई हे राज्याचे आर्थिक, प्रशासकीय आणि वैद्यकीय केंद्र असल्याने दररोज मोठ्या संख्येने प्रवासी या मार्गावरून प्रवास करतात. रेल्वेच्या तुलनेत कमी वेळेत मुंबई गाठता येत असल्याने या विमानसेवेला व्यापारी, उद्योजक, विद्यार्थी, शासकीय अधिकारी तसेच वैद्यकीय उपचारासाठी जाणाऱ्या रुग्णांकडून सातत्याने पसंती मिळत आहे. आता पूर्ण आसनक्षमतेने सेवा उपलब्ध होत असल्याने प्रवाशांना अधिक सोयीस्करपणे आरक्षण मिळण्याची शक्यता आहे. याशिवाय, मागणी आणि उपलब्धतेत संतुलन निर्माण झाल्यास तिकिटांच्या दरातही काही प्रमाणात स्थिरता येण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. पूर्ण क्षमतेने विमानसेवा सुरू होणार असल्याने जळगावसह धुळे, नंदुरबार आणि आसपासच्या जिल्ह्यांतील प्रवाशांनाही याचा लाभ होणार आहे.

हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक व मालक श्री. आनंद डिगंबर महाले यांनी महातेज पब्लिकेशनसाठी अविष्कार ग्राफिक्स, प्लॉट नं. 17, रामचंद्र नगर, भुसावळ रोड, जळगाव (महाराष्ट्र) 425002 येथे छापून गट नं. 160, प्लॉट नं. 51/52, सुप्रभा अपार्टमेंट, मराठा मंगल कार्यालयाजवळ, पटवारी कॉलनी, अमळनेर, जि. जळगाव (महाराष्ट्र) 425401 येथे प्रसिद्ध केले. संपादक :- आनंद डिगंबर महाले (रजि नं. MAHBIL/25/A0192), कार्यकारी संपादक श्री. भरत रघुनाथ पाटील ( पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची राहील.) या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक व कार्यकारी संपादक सहमत असतीलच असे नाही. महातेज पब्लिकेशन तथा ग्लोबल महातेज संबंधित कोणतेही वाद तथा खटले फक्त अमळनेर न्यायालयातच चालविले जातील. संपर्क : 7711004040, 7711004242, ई-मेल : globalmahatej@gmail.com



# २५ साल के अमन ५२ हजार करोड़ के बने मालिक

## एमआयटी छोड़ ४ साल में एआय प्लेटफॉर्म 'कर्सर' बनाया; स्पेसएक्स ने ५.६७ लाख करोड़ रुपए में खरीदा

सक्सेस स्टोरी

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

इलॉन मस्क की कंपनी स्पेसएक्स ने एआय कोडिंग प्लेटफॉर्म 'कर्सर' की पैरेंट कंपनी एनिसफियर को ६० अरब डॉलर यानी करीब ५.६७ लाख करोड़ रुपए में खरीदने के लिए एक मर्जर एग्रीमेंट किया है।

इस डील के बाद कर्सर के २५ वर्षीय भारतीय मूल के को-फाउंडर अमन संगर की अनुमानित नेटवर्थ बढ़कर ५.५ अरब डॉलर यानी करीब ५१.९८ हजार करोड़ रुपए हो गई है।

न्यूयॉर्क में जन्मे अमन संगर ने १४ साल की उम्र में कोडिंग शुरू कर दी थी। इसके बाद उन्होंने मैसाचुसेट्स इंस्टीट्यूट ऑफ टेक्नोलॉजी (एमआयटी) से कंप्यूटर साइंस की पढ़ाई की।


२०२२ में २१ साल की उम्र में अमन ने अपने तीन क्लासमेट्स- माइकल ट्रुएल, सुआलेह आसिफ और अरविद लुन्नेमार्क के साथ मिलकर कॉलेज छोड़ दिया। इन चारों ने इसी साल 'कर्सर' की शुरुआत की थी।

**मैकेनिकल से एआय कोडिंग तक का सफर**

शुरुआत में इन चारों फाउंडर्स ने मैकेनिकल इंजीनियरिंग इंडस्ट्री के लिए एक एआय कोपायलट बनाने की कोशिश की थी। हालांकि, बाद में उन्होंने अपना फोकस बदला और एआय-असिस्टेड कोडिंग प्लेटफॉर्म बनाने पर काम शुरू किया। लिंक्डइन पर अमन संगर ने अपने मिशन को बेहद आसान शब्दों में समझाया है- 'सॉफ्टवेयर बनाने के रास्ते में आने वाली सभी बाधाओं को दूर करना।'

**कर्सर कंपनी में अमन संगर की भूमिका**

एनिसफियर कंपनी में अमन संगर चीफ ऑपरेटिंग ऑफिसर के रूप में काम कर रहे हैं। वहीं उनके साथी माइकल ट्रुएल सीईओ की भूमिका में हैं और सुआलेह आसिफ प्रोडक्ट हेड के तौर पर काम देख रहे हैं। अमन संगर ने कर्सर की तेज ग्रोथ में महत्वपूर्ण भूमिका निभाई है, जहां वे प्रोडक्ट स्ट्रेटेजी, डिस्ट्रीब्यूशन और कम्युनिटी बिल्डिंग का काम संभालते हैं।



**क्या है कर्सर प्लेटफॉर्म?**

कर्सर एक एआय बेस्ड कोडिंग टूल है। इसे इस तरह बनाया गया है, ताकि सॉफ्टवेयर डेवलपर्स बहुत आसानी और तेजी से अपना कोड लिख सकें, उसमें सुधार कर सकें और उसे समझ सकें। पुराने कोडिंग टूल्स की तरह यह सिर्फ आगे का शब्द सुझाने (ऑटो-कम्प्लीट) का काम नहीं करता, बल्कि एक समझदार जोड़ीदार की तरह मदद करता है। यह आपके पूरे प्रोजेक्ट के कोड को एक साथ समझ सकता है और बड़ी से बड़ी कोडिंग समस्याओं को पल भर में हल कर देता है। अपनी इसी खूबी की वजह से यह डेवलपर्स और बड़ी कंपनियों के बीच काफी पसंद किया जा रहा है और एआय की दुनिया में तेजी से उभर रहा है।

**रिकॉर्ड कमाई : सालाना रेवेन्यू ४ अरब डॉलर पहुंचा**

कर्सर प्लेटफॉर्म ने नवंबर २०२५ में १ अरब डॉलर यानी करीब ९.४५ हजार करोड़ रुपए के सालाना रेवेन्यू का आंकड़ा पार किया था। इसके बाद भी कंपनी की ग्रोथ नहीं रुकी और फोर्ब्स के अनुसार, इस महीने की शुरुआत तक कर्सर का सालाना रेवेन्यू ४ अरब डॉलर यानी ३७.८१ हजार करोड़ रुपए तक पहुंच गया। मौजूदा समय में एनवीडिया, एडोबी, उबर, शॉपिफाई और पेपैल जैसी लगभग ५०,००० कंपनियों के लाखों सॉफ्टवेयर डेवलपर्स कोड जनरेट और एडिट करने के लिए कर्सर का इस्तेमाल कर रहे हैं।

**अमन संगर का बैकग्राउंड और भारतीय कनेक्शन**

कर्सर की शुरुआत से पहले अमन संगर ने ब्रिजवाटर एसोसिएट्स और गूगल में इंटर्नशिप की थी, साथ ही वे अपनी खुद की एआय कंसल्टेंसी भी चलाते थे। उनके पिता अरविंद संगर आयआयटी बॉम्बे के पूर्व छात्र और हेज फंड प्रोफेशनल हैं, जबकि उनकी मां शिल्पा संगर एक ऑर्थोडॉन्टिस्ट और एंटरप्रेन्योर हैं। अमन की यह सफलता वैश्विक एआय को आकार दे रहे भारतीय मूल के उन फाउंडर्स की बढ़ती लहर का हिस्सा है, जो आयआयटी या बेंगलुरु से नहीं, बल्कि एमआयटी और सिलिकॉन वैली से उभर रहे हैं।

**स्पेसएक्स डील की खास बातें**

स्पेसएक्स ने मंगलवार को ऑल-स्टॉक ट्रांजैक्शन (शेयरों के जरिए) के तहत एनिसफियर के टेकओवर के लिए मर्जर एग्रीमेंट साइन किया है। यह घोषणा स्पेसएक्स के नैस्डैक पर रिकॉर्ड-ब्रेकिंग आयपीओ आने के ठीक चार दिन बाद हुई है। स्पेसएक्स ने कहा है कि उसे २०२६ की तीसरी तिमाही तक इस मर्जर प्रक्रिया के पूरा होने की उम्मीद है। अमन संगर ने एक्स पर पोस्ट किया- 'कुछ बहुत ही मजबूत मॉडल्स को ट्रेन करने के लिए उत्साहित हूं!'

# मखाना खाल्ल्याने शरिराला कोणते आरोग्यदायी फायदे मिळतात?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**



मखानामध्ये कॅलरीज कमी आणि फायबर जास्त असते. त्यामुळे पोट दीर्घकाळ भरलेले राहते आणि वारंवार भूक लागण्याची समस्या कमी होते.

**हृदयाच्या आरोग्यासाठी फायदेशीर**

मखानामध्ये मॅग्नेशियम आणि पोटॅशियमसारखे पोषक घटक असतात. हे रक्तदाब नियंत्रित ठेवण्यास आणि हृदयाचे आरोग्य सुधारण्यास मदत करतात.

**पचनक्रिया सुधारते**

फायबरयुक्त असल्यामुळे मखाना पचनक्रिया सुरळीत ठेवण्यास मदत करतो. बद्धकोष्ठता आणि पोटाच्या इतर किरकोळ तक्रारी कमी होऊ शकतात.

**हाडे मजबूत बनवतो**

मखानामध्ये कॅल्शियमचे प्रमाण चांगले असते. त्यामुळे हाडे आणि दात मजबूत राहण्यास मदत मिळते.

**मधुमेह नियंत्रणात मदत**

मखानाचा ग्लायसेमिक इंडेक्स कमी असल्यामुळे रक्तातील साखरेची पातळी संतुलित ठेवण्यास मदत होऊ शकते.

**अँटिऑक्सिडंट्सचा चांगला स्रोत**

मखानामध्ये अँटिऑक्सिडंट्स भरपूर प्रमाणात असतात. हे शरीरातील पेशींना नुकसान करणाऱ्या फ्री रॅडिकल्सपासून संरक्षण देतात.

**एनर्जी वाढविण्यासाठी उपयुक्त**

प्रथिने आणि आवश्यक खनिजांनी समृद्ध असलेला मखाना शरीराला एनर्जी देतो. त्यामुळे थकवा कमी होऊन दिवसभर उत्साह टिकून राहण्यास मदत होते.

# चहा बंद करायची गरज नाही...


## डॉक्टरांचा सल्ला; फक्त पिण्यापूर्वी करा एक काम

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

भारतातील बहुतांश लोकांच्या दिवसाची सुरूवात चहाने होते. मात्र, सकाळी रिकाम्या पेट चहा पिणे आरोग्यासाठी नुकसानकारक ठरू शकते. रिकाम्यापोटी गरम चहा प्यायल्याने पोटाचे आरोग्य बिघडते आणि दिवसभर गॅस, ॲसिडिटी व पोट फुगणे यांसारख्या समस्या जाणवतात.

सकाळी शरीरात स्ट्रेस हार्मोन्स वाढलेले असतात, अशा वेळी चहातील कॅफिनमुळे ताण आणि एंग्जायटी आणखी वाढू शकते. रिकाम्यापोटी चहा पिण्याच्या या सवयीमुळे आरोग्याला अपाय होऊन पुढे मधुमेह होण्याचा धोकाही वाढतो. यावर सोपा उपाय म्हणजे सकाळी चहा पिण्यापूर्वी किमान दोन ग्लास साधे पाणी प्यावे, ज्यामुळे चहाचा दाहकपणा बऱ्याच अंशी कमी होतो.

पाणी प्यायल्यामुळे चहा पोटात जास्त गरम लागत नाही आणि सौम्य झाल्यामुळे त्याचे दुष्परिणाम जवळजवळ नगण्य होतात. चहापेक्षा त्यासोबत खाल्ले जाणारे अनहेल्दी स्नॅक्स (तळलेले नमकीन, मैद्याचे बिस्किट्स, खारी) शरीराला जास्त नुकसान पोहोचवितात. चहासोबत मैद्याचे किंवा तळलेले पदार्थ खाण्याऐवजी भाजलेले चणे, मखाने, मुरमुरे, पोहे किंवा पराठा यांसारखे पौष्टिक पदार्थ खावेत.



# १० व्या वर्षी लावणीला सुरूवात, गर्भावस्थेतही गाजवला रंगमंच!

## कोण होत्या तमाशा सम्राज्ञी विठाबाई नारायणगावकर?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**






विकी कौशलची मुख्य भूमिका असलेल्या 'छावा' या चित्रपटाच्या घवघवीत यशानंतर आता दिग्दर्शक लक्ष्मण उतेकर 'ईठा' हा नवीन चरित्रपट घेऊन प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहेत. लोकप्रिय लोककलाकार विठाबाई नारायणगावकर यांच्या जीवनावर आधारित या चित्रपटात बॉलीवूड अभिनेत्री श्रद्धा कपूर झळकणार आहे.

'ईठा' या चित्रपटाची गेल्या काही दिवसांपासून चर्चा सुरू होती. दि. २४ जून २०२६ रोजी या चित्रपटाचा टीझर रिलीज झाला. त्यामुळे सध्या सोशल मीडियावर या चित्रपटाची चर्चा सुरू आहे. तर यातील श्रद्धाचा लूकसुद्धा व्हायरल होत आहे. श्रद्धा यामध्ये मुख्य भूमिकेत असून यामधून ती लावणी करताना दिसणार आहे. त्यामुळे ही भूमिका खऱ्या अर्थाने तिच्या करिअरला मोठं वळण देणारी ठरू शकते. पण तुम्हाला माहीत आहे का श्रद्धा कपूर 'ईठा' चित्रपटात साकारत असलेल्या विठाबाई नारायणगावकर नेमक्या कोण होत्या, त्यांची कौटुंबिक पार्श्वभूमी काय आहे आणि त्यांची कारकिर्द कशी राहिली आहे? चला तर याबद्दल सविस्तर जाणून घेऊयात.

**वयाच्या १० व्या वर्षापासून सुरू झाला लोककलेचा प्रवास**

'ईठा'चा टीझर रिलीज झाल्यापासून याबद्दल मोठ्या प्रमाणात चर्चा होऊ लागली आहे. अशातच आता विठाबाई नारायणगावकर यांचा एक जुना व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल होत आहे. यामध्ये त्या त्यांचा संघर्षकाळ सांगताना दिसत आहेत. यावेळी त्यांनी त्या वयाच्या १० व्या वर्षापासून नृत्य करायला लागल्या असून, त्यांच्या वडिलांची परिस्थिती खूप हालाकीची होती, असे सांगितले आहे.

**पंढरपूरमध्ये झालेला जन्म**

१ जुलै १९३५ रोजी महाराष्ट्रातील पंढरपूर येथे जन्मलेल्या विठाबाई नारायणगावकर यांचा तमाशा आणि रंगभूमीशी परिचय अगदी लहानपणापासूनच झाला. त्यांचे वडील आणि काका या क्षेत्रात कार्यरत होते. दरम्यान, त्यांचे आजोबा नारायण खुडे यांनी पारंपरिक फिरता लोककलाविष्कार असलेला तमाशाचा कलापथक स्थापन केला होता. पुढे हा कलापथक त्यांच्या वडिलांनी आणि काकांनी 'भाऊ-बापू मांग' या नावाने चालवला.

**लग्नानंतर आले अनेक चढ-उतार**

मारुती सावंत यांच्याशी लग्न झाल्यानंतर त्यांच्या आयुष्यात अनेक चढ-उतार आले आणि वैवाहिक जीवनही संघर्षमय राहिलं. मात्र, या अडचणींनाही न जुमानता त्यांनी आपली कलासाधना सुरू ठेवली. लावणी आणि तमाशा या लोककलांना मोठ्या प्रमाणात प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यात त्यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. त्यांच्या सादरीकरणांमध्ये संगीत, नृत्य आणि कथाकथन यांचा रंगतदार संगम पाहायला मिळायचा. त्यामुळे महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून येऊन लोक त्यांच्या कार्यक्रमांना मोठ्या संख्येने उपस्थित राहायचे. त्यांच्या उल्लेखनीय कामासाठी त्यांना तमाशा क्षेत्रातील प्रतिष्ठेचा राष्ट्रपती पुरस्कार मिळाला.

**वयाच्या ६६ व्या वर्षी झालं निधन**

चाहत्यांनी त्यांना प्रेमाने 'तमाशा सम्राज्ञी' ही उपाधी दिली. त्यांच्या स्मरणार्थ महाराष्ट्र शासनाने २००६ मध्ये 'विठाबाई नारायणगावकर जीवनगौरव पुरस्कार' सुरू केला. विठाबाईंचे व्यक्तिमत्त्व महाराष्ट्रात समर्पण, जिद्द आणि धैर्याचे प्रतीक मानले जाते. १५ जानेवारी २००२ रोजी वयाच्या ६६ व्या वर्षी, अर्धांगवायूचा झटका आल्याने त्यांचे महाराष्ट्रातील नारायणगाव येथे निधन झाले. 'ईठा' या चित्रपटाचा टीझर नुकताच रिलीज झाला असून टीझरमध्ये विठाबाईंच्या गर्भावस्थेतील प्रसंगाची झलक दाखविण्यात आली आहे. हा प्रसंग त्यांच्या कलेप्रती असलेल्या समर्पणाचा आणि जिद्दीचा पुरावा मानला जातो.

दरम्यान, श्रद्धा कपूरचा 'ईठा' हा चित्रपट येत्या २६ ऑगस्ट २०२६ ला प्रदर्शित होणार आहे. या चित्रपटात तिच्यासह अभिनेता रणदीप हुडासुद्धा महत्त्वपूर्ण भूमिकेत झळकणार आहे.

शांत - चांगल्या झोपेसाठी चांगला पलंग नव्हे तर चांगली गादी आवश्यक आहे.
सर्वोत्तम क्वालिटीच्या गादी साठी



एकमेव ४५ वर्षांचा समृद्ध अनुभव असलेले शोरुम
सीमा हॅण्डलूम हॉउस पारोला रोड, धुळे






# श्री मंगळग्रह देवांची शांती, मंत्र व उपाय

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

श्री मंगळग्रह हा पराक्रम आणि धैर्याचा कारक मानला जातो. श्री मंगळग्रहाच्या शांतीसाठी अनेक उपाय सांगण्यात आले आहेत. यामध्ये मंगळवारचे व्रत, हनुमानजींची पूजा आणि सुंदरकांडाचे पठण इत्यादी प्रमुख आहेत. कुंडलीतील श्री मंगळग्रहाची शुभ स्थिती शारीरिक आणि मानसिक शक्ती देते. दुसरीकडे श्री मंगळग्रहाच्या अशुभ प्रभावामुळे मांस, रक्त आणि हाडांचे रोग होतात. श्री मंगळग्रह अशुभ फळ देत असेल तर श्री मंगळग्रहाशी संबंधित उपाय करावेत. श्री मंगळग्रहाच्या शांतीसाठी मंगळ यंत्राची स्थापना, मंगळवारी मंगळाशी संबंधित वस्तूंचे दान, अनंतमूळे धारण करावे. याशिवाय वैदिक ज्योतिषशास्त्रात श्री मंगळग्रहाशी संबंधित अनेक उपाय सांगण्यात आले आहेत. ही कामे केल्याने श्री मंगळग्रहाचे शुभ परिणाम प्राप्त होतात आणि अशुभ प्रभाव दूर होतात.



### पोशाख आणि जीवनशैलीशी संबंधित श्री मंगळग्रह शांतीसाठी उपाय

- लाल आणि तांबूस रंगाचे कपडे घाला.
- आपल्या मातृभूमीचा आणि सैन्याचा आदर करा.
- भाऊ, भावजय आणि मित्र यांच्याशी सौहार्दपूर्ण वागणूक ठेवा.
- मंगळवारी पैसे उधार घेऊ नका
- विशेषतः सकाळी केले जाणारे श्री मंगळग्रहाचे उपाय
- हनुमानजींची पूजा करा.
- नरसिंह देवाची पूजा करा.
- भगवान कार्तिकेयाची पूजा करा.
- सुंदरकांड वाचा.

### श्री मंगळग्रह कृपेसाठी उपवास

मंगळदोष दूर करण्यासाठी आणि श्री मंगळग्रह देवांची शुभ दृष्टी मिळविण्यासाठी मंगळवारी व्रत ठेवा.

### शांततेसाठी दान करा

मंगळाच्या होरा आणि मंगळाच्या नक्षत्रात (मृगशिरा, चित्रा, धनिष्ठा) मंगळाशी संबंधित वस्तूंचे दान मंगळवारी करावे.

दान करावयाच्या वस्तू लाल मसूर, खंड, बडीशेप, मूग, गहू, लाल कणेरची फुले, तांब्याची भांडी आणि गूळ इत्यादी.

### श्री मंगळग्रह देवांच्या कृपेसाठी रत्ने

श्री मंगळग्रह देवांसाठी कोरल रत्न धारण केले जाते. कोरल रत्न धारण केल्याने श्री मंगळग्रहाचे सकारात्मक परिणाम मिळतात. मेष आणि वृश्चिक राशीच्या लोकांसाठी हे रत्न खूप फायदेशीर आहे.

### मंगल यंत्र

कुंडलीतील मांगलिक दोषामुळे जीवनात विवाह इत्यादी समस्या येतात. मंगल यंत्र बसवून या सर्व अडचणी दूर केल्या जाऊ शकतात. मंगळवारी मंगळाच्या होरा आणि मंगळाच्या नक्षत्राच्या वेळी मंगल यंत्र धारण करा.

### श्री मंगळग्रहासाठी जडी

श्री मंगळग्रहाच्या शांतीसाठी अनंत मूळ औषधी धारण करा. मंगळाच्या होरा आणि मंगळाच्या नक्षत्रात मंगळवारी ही औषधी धारण करा.

### मंगळसाठी रुद्राक्ष

मंगळासाठी ३ मुखी रुद्राक्ष धारण करणे लाभदायक आहे.

### सहा मुखी रुद्राक्ष धारण करण्याचा मंत्र

ॐ ह्रीं हूं नमः।

ॐ ह्रीं श्रीं क्लीं सौं।।

### अकरा मुखी रुद्राक्ष धारण करण्याचा मंत्र–

ॐ ह्रीं हूं नमः।

हस्फ्रें ख्फ्रें हस्त्रौं हस्ख्फ्रें हसौं।

### मंगल मंत्र

श्री मंगळग्रहापासून अपेक्षित परिणाम मिळविण्यासाठी मंगल बीज मंत्राचा जप करा. मंत्र –

ॐ क्रां क्रीं क्रौं सः भौमाय नमः

मंगळ मंत्राचा जप १००० वेळा करावा. तथापि, देश–काळ–पत्र तत्त्वानुसार, कलियुगात या मंत्राचा ४० हजार वेळा जप करण्यास सांगितले आहे.

### तुम्ही या मंत्राचाही जप करू शकता

ॐ भौं भौमाय नमः अथवा ॐ अं अंगराकाय नमः

### श्री मंगळग्रह शांतीचा उपाय

विधीनुसार केल्याने तुम्हाला श्री मंगळग्रह देवांचा कृपाशीर्वाद नक्कीच मिळेल आणि तुमचे धैर्य, शक्ती आणि पराक्रम वाढेल. ज्योतिषशास्त्रात श्री मंगळग्रह देव हे निश्चितपणे पापी ग्रहांच्या श्रेणीत आहेत. पण श्री मंगळग्रह देवांचा प्रभाव नेहमीच अशुभ नसतो. हे खरे आहे की जन्मकुंडलीतील श्री मंगळग्रहांच्या स्थानामुळे मंगळदोष निर्माण होतो. ज्याचा वैवाहिक जीवनावर परिणाम होतो. श्री मंगळग्रह देव रक्तवर्णीय असल्यामुळे त्यांचा संबंध लाल रंगाशी आहे.

### वैदिक ज्योतिषशास्त्रात

श्री मंगळग्रह देव हे मेष आणि वृश्चिक या राशींचे स्वामी आहेत. त्यामुळे या राशींच्या लोकांनी श्री मंगळग्रह देवांना प्रसन्न करण्यासाठी उपाय अवश्य करावेत. मंगळ शांतीसाठी उपाय केल्यास श्री मंगळग्रह देवांमुळे होणाऱ्या त्रासापासून मुक्ती मिळतेच. उलट हे उपाय तुमच्यासाठी खूप फायदेशीर ठरतील. मंगळ व्रत, श्री मंगळग्रह देवांशी संबंधित वस्तूंचे दान, मंगळ यंत्राची पूजा आणि मंगळ शांती मंत्राचा जप इत्यादी केल्याने श्री मंगळग्रह देवांशी संबंधित त्रास दूर होतो.



# मंगळवारी करा हनुमानजींचे हे उपाय

## सर्व समस्या, प्रश्न सुटणे शक्य

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

ग्रह आणि ताऱ्यांच्या रोजच्या बदलत्या हालचाली सर्व राशींसाठी काही अंदाज बांधतात. ही युक्ती समजली तर आपले जीवन सुधारू शकते. ज्योतिष शास्त्रात असे काही उपाय सांगण्यात आले आहेत जे केल्याने कोणतीही व्यक्ती आपल्या सर्व समस्यांपासून मुक्ती मिळवू शकते. हे उपाय करण्यासाठी खर्च किंवा मेहनत नाही. आज आम्ही तुम्हाला अशा काही उपायांबद्दल माहिती देणार आहोत जे मंगळवारी केल्यास तुमच्या समस्या सुटणे शक्य होईल.

### या उपायांनी होतील सर्व समस्या दूर

मंगळवारी सकाळी स्नान केल्यानंतर कोणत्याही हनुमान मंदिरात जावे. तेथे हनुमानजींना दिवा, फुले, हार आणि लाडू–पान अर्पण करा. यानंतर तेथे बसून १०८ वेळा हनुमान चालिसाचा पाठ करा. यानंतर तुमचे संकट दूर करण्यासाठी बजरंग बलीला प्रार्थना करा. हा उपाय दर मंगळवारी आणि शनिवारी करावा. हा उपाय केल्याने कुंडलीतील सर्व ग्रह शुभ फळ देऊ लागतात.

मंगळवारी सकाळी किंवा दुपारी अशा ठिकाणी जा जेथे माकडे खूप आहेत. त्यांना गूळ, केळी, हरभरा, शेंगदाणे इत्यादी खाद्यपदार्थ द्या. शक्य असल्यास भिकाऱ्यालाही अन्न द्या. यानंतर तुम्ही तुमच्या कामात मन लावून व्यस्त व्हा. लवकरच तुम्हाला पैसे मिळू लागतील. लक्षात ठेवा हा उपाय सूर्यास्तानंतर करू नये. भिकाऱ्याला केव्हाही अन्न पुरवले जाऊ शकते, तरी त्याला अन्नासाठी पैसे देऊ नका, तर त्याला अन्न खायला द्या.

मंगळवारी सकाळी हनुमानजी मंदिरात जा. तेथे त्यांना शेंदूर परिधान करून गुलाबाच्या फुलांचा हार घालावा. देशी तुपाचा दिवा लावा आणि तिथे बसून सुंदरकांड पाठ करा. असे सलग ११ मंगळवार केल्याने सर्वात मोठे संकट देखील टळू शकते, विशेषतः अकाली मृत्यू टाळण्यासाठी हा रामबाण उपाय असल्याचे सांगितले जाते.

कुंडलीत शनीची महादशा चालू असेल किंवा शुभ ग्रहांवर शनीच्या पक्षामुळे अशुभ प्रभाव पडत असतील तर मंगळवारी १०८ तुळशीच्या पानांवर पिवळ्या चंदनाने श्रीरामचंद्रांचे नाव लिहावे. त्यानंतर या पानांची माळ बनवून हनुमानजींना वाहावी. यामुळे शनी, मंगळ आणि राहूशी संबंधित सर्व दोष लगेच दूर होतात. हा उपाय करणाऱ्या व्यक्तीला कोणत्याही प्रकारचा त्रास होत नाही.

### मंगळवारी करा गणपती बाप्पा आणि देवीचे हे उपाय

मंगळवारी गणपती बाप्पांना लाल वस्त्र, लाल फुले, लाल फळे आणि लाल मिठाई अर्पण करावी. यामुळे इच्छित इच्छा पूर्ण होते. मंगळवारी श्रीगणेश मंदिरात किंवा देवींच्या मंदिरात जाऊन ध्वजारोहण करावे. यानंतर घरातील सर्व भांडार भरण्यासाठी देवाला प्रार्थना करावी. हा उपाय सतत ५ वेळा केल्याने घरात पैसा येऊ लागतो आणि घरातील सर्व अडथळे दूर होतात.

# हनुमानजींच्या ८ गुप्त शक्ती कोणत्या?

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

हनुमानजींना एक शूर, बलवान आणि शक्तिशाली देव म्हणून आपण सर्वजण ओळखतो. परंतु असे असूनही त्यांच्या काही रहस्यमय आणि अद्भुत शक्तींबद्दल अनेकांना काहीही माहिती नाही. या शक्तींनी त्यांना केवळ चमत्कारिक बनविले नाही तर कोणत्याही योद्ध्याला पराभूत करण्याची क्षमता देखील दिली. म्हणूनच हनुमानजींमध्ये रावणालाही पराभूत करण्याची क्षमता होती. चला तर मग हनुमानजींच्या ८ दुर्मिळ आणि कमी ज्ञात शक्तींबद्दल जाणून घेऊया. ज्या जाणून घेतल्याने कोणताही भक्त प्रेरित होईल.



### हनुमानजींच्या ८ अद्भुत शक्ती ज्या तुम्हाला माहिती नाहीत

**१) अनिमा शक्ती (सूक्ष्म स्वरूप धारण करणे)**

हनुमानजी त्यांचे शरीर इतके लहान करू शकत होते की ते सुईच्या टोकावर बसू शकेल. लंकेत प्रवेश करताना त्यांनी या शक्तीचा वापर केला. या शक्तीचा वापर करून हनुमानजींनी अनेक वेळा आपल्या शत्रूंचा पराभव केला आहे.

**२) महिमा शक्ती (विशाल रूप धारण करून)**

हनुमानजी आपला आकार जितका लहान करू शकत होते तितकाच तो मोठा देखील करू शकत होते. या शक्तीचा वापर करून तो आपला आकार विश्वाच्या आकाराइतका वाढवू शकतो. रामायणातील समुद्र ओलांडताना त्याचे 'महावीर रूप' हे याचा पुरावा आहे.

**३) गरिमा (अविश्वसनीयपणे जड होण्याची शक्ती)**

हनुमानजी आपले वजन अनेक वेळा सन्मानाने उचलू शकत होते. हे सामर्थ्य त्यांची चिकाटी आणि कर्तव्याप्रती अढळ वचनबद्धता दर्शविते.

**४) लघिमा (वजनरहित असण्याची शक्ती)**

ज्याप्रमाणे हनुमानजी स्वतःला जड बनवू शकत होते त्याचप्रमाणे ते स्वतःला पंखासारखे हलके देखील बनवू शकत होते. या शक्तीचा वापर करून ते गुरुत्वाकर्षणाच्या विरुद्ध आकाशात उडू शकत होते. त्यांनी याचा वापर लंकेला उड्डाण करण्यासाठी आणि एक संपूर्ण पर्वत वाहून नेण्यासाठी केला, या सर्व गोष्टींनी त्याची अफाट शक्ती आणि भक्ती दर्शविली.

**५) चिरंजीवित्व (अमरत्व)**

हनुमानजींना युगानुयुगे जीवंत राहण्याचा आशीर्वाद मिळाला आहे. जोपर्यंत श्रीरामचंद्रांचे नाव या जगात आहे तोपर्यंत ते या पृथ्वीवर उपस्थित राहतील.

**६) गर्वित आत्मसंयम (अजिंक्य मानसिक शक्ती)**

त्यांचा आत्मविश्वास इतका प्रबळ होता की त्याला कोणत्याही भीतीचा किंवा आसक्तीचा त्रास झाला नाही. हनुमानजींना भीती, शंका किंवा गोंधळ नव्हता. लंकेत रावणासमोर निर्भयपणे उभे राहणे हे याचा पुरावा आहे. ध्यान आणि तपश्चर्येतून त्याने ही शक्ती प्राप्त केली होती.

**७) वायूगती (सर्वांत जास्त वेगाने हालचाल करण्याची शक्ती) आणि दिव्य मंत्र सिद्धी (मंत्राच्या शक्तीने चमत्कारिक कामे करणे)**

हनुमानजींकडे विशेष दिव्य मंत्रांची शक्ती होती, ज्याच्या मदतीने ते अदृश्य होऊ शकत होते, उडू शकत होते आणि असाधारण कार्ये करू शकत होते. हनुमानजी त्यांचे वडील पवन देव यांच्यासारखे इतक्या वेगाने पुढे जाऊ शकतात, की कोणीही त्यांना पकडू शकत नाही. या कारणास्तव त्यांना 'मारुतीनंदन' असे म्हणतात.

**८) वशित्व आणि इशित्व (वश करण्याची आणि नियंत्रित करण्याची शक्ती)**

ही हनुमानजींना इतरांवर नियंत्रण ठेवण्याची शक्ती होती. इशित्वाने हनुमानजींना निसर्ग आणि सृष्टीच्या सर्व शक्तींवर नियंत्रण आणि आज्ञा देण्याची शक्ती दिली.



# गणांचा–ईश म्हणजेच गणपती बाप्पा!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

'गणेश' शब्दाचा अर्थ गणांचा–ईश वा प्रभू असा आहे. 'गण' म्हणजे भगवान शिवजी व माता पार्वती यांचे सेवक होय. गणांचा अधिपती म्हणून 'गणपती बाप्पा' असेही नाव या देवतेस आहे. महाराष्ट्रात हे नाव विशेष लोकप्रिय आहे. 'विनायक' हे नाव दक्षिणेत वापरतात. हे नाव 'गणपती' नावाशी संबंधित आहे. विनायक–शब्दाचा अर्थ 'वि' म्हणजे विशिष्टरूपाने जो नायक (नेता) आहे तो. याच अर्थाने 'गणाधिपती' नावही प्रचारित आहे. 'हेरंब' नाव देशीय प्राकृत शब्द हेरिम्बोपासून आले आहे. हेरंब म्हणजे दीनजनांचा तारणकर्ता होय.

वक्रतुण्ड, एकदंत, महोदय, गजानन, विकट आणि लंबोदर ही गणपती बाप्पांची देहविशेष दर्शविणारी नावे आहेत. वक्रतुण्ड म्हणजे ज्याचे तुण्ड (तोंड) वक्र वा वाकडे आहे तो. गणपती बाप्पांच्या सोंडेमुळे चेहरा थोडासा वक्र दिसतो त्यामुळे हे नाव. एकदंत म्हणजे ज्याला एक दात आहे तो. गणपती बाप्पांना एक दात असण्याच्या अनेक पौराणिक कथा सांगितल्या जातात.

प्रथम कथेनुसार परशुरामाने युद्धात गणपती बाप्पांचा एक दात उपटला. दुसऱ्या कथेनुसार कैलास पर्वतावर गणपती बाप्पांनी रावणास अडवले म्हणून रावणाने गणपती बाप्पांच्या एका दाताचे उत्पाटन केले. आणखी एका कथेनुसार खेळाखेळांतील लढाईत कार्तिकेयाने गणपती बाप्पांचा एक दात भग्न केला. महोदर आणि लम्बोदर शब्दांचा अर्थ अनुक्रमे महा म्हणजे मोठे उदर (पोट) असणारा व लंब वा लांबडे उदर (पोट) असणारा असा आहे. ही दोन्ही नावे गणपती बाप्पांचे स्थूलत्व दाखवितात. विघ्नराज वा विघ्नेश्वर शब्दाचा अर्थ सकल विघ्न वा बाधांचा अधिपती असा आहे. पुराणात सर्वत्र गणपती बाप्पांचा विघ्नाधिपती म्हणून उल्लेख आढळतो. सकल बाधांचा एकच्छत्र अधिपती व नियंत्रक असल्यामुळे गणपती बाप्पांना हे नाम प्राप्त झाले, अशी शास्त्रीय मान्यता आहे.




# बुद्धिदाता बाप्पांच्या प्रत्येक अवयवांपासून मिळते 'हे' ज्ञान!

**ग्लोबल महातेज वृत्तसेवा**

गणपती बाप्पांना सर्व देवी –देवतांमध्ये श्रेष्ठ मानले जाते. हेच कारण आहे, की कोणतेही शुभ कार्य करण्यापूर्वी फक्त गणपती बाप्पांचे ध्यान केले जाते. भगवान शिवजी हे गणांचे प्रमुख असल्यामुळे त्यांना गणेश आणि गणाध्यक्ष असेही म्हटले जाते. मोठे पोट, लांब कान आणि रुंद कपाळ असलेले गणपती बाप्पा खोडकर तर होतेच, पण त्यांचा प्रत्येक अवयव म्हणजे शिक्षकच आहे. ज्यापासून आपल्याला ज्ञानप्राप्ती होते. चला तर जाणून घेऊया बाप्पांचा प्रत्येक अवयव आपल्याला काय शिकवितो?

### रुंद कपाळ

श्रीगणेशांचे रुंद कपाळ हे नेतृत्वाचे प्रतीक आहे. शास्त्रानुसार ज्या व्यक्तीचे डोके मोठे आहे त्याच्याकडे नेतृत्व गुण असतात. एवढेच नाही तर त्याचे मोठे डोके असे ज्ञान देखील देते जे तुमचे विचार लहान नाही तर मोठे बनविते.

### छोटे डोळे

बाप्पांचे लहान डोळे हे ज्ञान देतात, की सर्वकाही बारकाईने पाहिल्यानंतर आणि चाचणी केल्यानंतरच पुढे जा. कारण जे हे करतात ते कधीच फसत नाहीत. दुसरीकडे शास्त्रानुसार लहान डोळे असलेले लोक चिंतनशील आणि गंभीर स्वभावाचे असतात.

### सुपासारखे लांब कान

लांब कानांमुळे बाप्पांना 'गजकर्ण' आणि 'सूपकर्ण' असेही म्हणतात. बाप्पांचे लांब कान शिकवितात, की तुमच्या कानापर्यंत ज्या काही वाईट गोष्टी पोहोचतात, ते बाहेर सोडा. वाईट गोष्टी तुमच्यामध्ये येऊ देऊ नका. त्याचबरोबर गणेशजींच्या लांब कानांचे एक रहस्य हेही आहे की ते सर्वांचे ऐकतात आणि नंतर आपल्या बुद्धिमत्तेने आणि विवेकबुद्धीने निर्णय घेतात. शास्त्रानुसार लांब कान असलेली व्यक्ती भाग्यवान असते आणि त्याला दीर्घायुष्य लाभते.

### गणपती बाप्पांची सोंड

गणपती बाप्पांची सोंड सदैव फिरत असते, जी प्रत्येक क्षणी सक्रिय असण्याचे लक्षण आहे. जो व्यक्ती हे करतो त्याला कधीही दुःख आणि गरिबीचा सामना करावा लागत नाही. बाप्पांच्या सोंडेच्या दिशेलाही शास्त्रांमध्ये वेगळे महत्त्व देण्यात आले आहे.

### मोठे पोट

वाढलेल्या मोठ्या पोटामुळे गणपती बाप्पांना 'लंबोदर' म्हटले जाते. त्यांच्या मोठ्या पोटाचे रहस्य हे आहे की ते प्रत्येक चांगल्या आणि वाईट गोष्टी पचवतात आणि कोणत्याही प्रकरणाचा निर्णय बुद्धिमत्तेने घेतात. यातून आपल्यालाही तेच शिक्षण मिळते की आपण येथे आणि तेथे कोणाबद्दल कधीही बोलू नये. जो व्यक्ती हे करतो तो नेहमी आनंदी असतो.

### एकच दात

बालपणात परशुरामाबरोबर गणपती बाप्पांच्या लढाई दरम्यान गणपती बाप्पांचा एक दात कापला गेला होता. त्यानंतर श्रीगणेश 'एकदंत' म्हणून ओळखला जाऊ लागला. त्याच्या दातांपैकी एक म्हणजे बुद्धिमत्तेचा परिचय. बाप्पा तुटलेल्या दातापासून शिकवितात, की गोष्टींचा योग्य वापर कसा करावा.

(वरील माहिती विविध धर्मग्रंथांतून संकलीत केली आहे.)